संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी

# बिगर अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा)
## महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग
## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद

**(सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्य झाल्याने खुल्या प्रवर्गातील वाढ होणा-या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गासाठी व दिव्यांगाचे वाढीव आरक्षण व नव्याने समाविष्ट दिव्यांग प्रवर्गाची पदे भरण्यासाठी जाहिरात) सन २०२१**

महाराष्ट्र शासनाचे ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र. संकीर्ण/ २०१८/ प्रक्र२४११/ आस्था-८, दिनांक ३१ डिसेंबर २०१८ व ०१ जानेवारी २०१९ चे पत्रानुसार ग्राम विकास विभागाकडील १८ संवर्गातील पदांचा भरतीयोग्य पदामध्ये समावेश करून पदभरती करण्यास मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार जिल्हा परिषद औरंगाबादच्या अखत्यारीतील १४ संवर्गातील रिक्त पदे भरणे करिता महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२०१८/ प्र. क्र.२०/ आ.पु.क. दिनांक १६ मे २०१८, व वित्त विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक २८ डिसेंबर, २०१८ अन्वये पदभरतीस मान्यता दिल्यानुसार दिनांक ०३ मार्च २०१९ रोजी दैनिक दिव्य मराठी, दैनिक महाराष्ट्र टाईम्स मराठी, दैनिक लोकविजय, दैनिक लोकसंग्रह, साप्ताहिक युवकझुंज या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून www.mahapraiksha.gov.in या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात आले आहेत.

शासन निर्णय संकीर्ण/२०२०/प्र.क्र.९९/अस्था-८ दिनांक १४/०६/२०२१ व शासन शुध्दीपत्र दिनांक २०/८/२०२१ अन्वये राज्यातील कोविड-१९ चा प्रादुर्भाव आणि साथरोगाची शक्यता विचारात घेवून दि. ०३/०३/२०१९ मध्ये नमूद पदांपैकी केवळ आरोग्य विभागाशी संबंधित ५ संवर्गाच्या पदांची भरती केली जाणार आहे. शासन निर्णय क्र दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६-अ दिनांक २९ मे २०१९ अन्वये दिलेल्या सूचना नुसार या भरतीमध्ये केंद्र शासनाच्या दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार नव्याने निर्माण झालेले दिव्यांग प्रवर्ग आणि सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्द झाल्याने खुल्या प्रवर्गाच्या पदसंख्येत झालेली वाढ व त्यानुसार देय होणारे समांतर आरक्षण या प्रमाणे नव्याने पदसंख्या खालील प्रमाणे निश्चित करुन जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

<table>
<tr><th rowspan="2">अ क्र</th><th rowspan="2">संवर्ग</th><th rowspan="2">दि.३.३.१९ च्या जाहिराती मध्ये दर्शवलेली एकूण पदे</th><th colspan="10">दिव्यांगासाठी राखीव असलेली एकूण पदे</th><th rowspan="2">गट</th><th rowspan="2">दिव्यांगाचा प्रकार</th><th rowspan="2">राखीव पद संख्या</th></tr>
<tr><th>अ.जा.</th><th>अ.ज.</th><th>वि.जा.(अ)</th><th>भ.ज.(ब)</th><th>भ.ज.(क)</th><th>भ.ज.(ड)</th><th>इ.मा.व.</th><th>वि.मा.प्र.</th><th>इ.डब्ल्यु.एस.</th><th>खुला</th></tr>
<tr><td rowspan="5">१</td><td rowspan="5">आरोग्य सेवक (महिला) १०० टक्के</td><td rowspan="5">१८९</td><td colspan="10" rowspan="5">९<br><br>(टिप - सन २०१९ मधील जाहिरातीमध्ये एका पायाने दिव्यांग असलेल्या उमेदवारासाठी एक पद राखीव ठेवण्यात आले आहे.)</td><td>अ</td><td>अल्पदृष्टी Low vision</td><td>३</td></tr>
<tr><td>ब</td><td>कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता Deaf (D), Hard of hearing (H H)</td><td>२</td></tr>
<tr><td>क</td><td>मेंदूचा पक्षघात Cerebrel palsy (CP)<br>कुष्ठरोग मुक्त Leprosy Cured (LC),<br>शारीरिक वाढ खुंटणे Dwarfism (Dw),<br>आम्ल हल्लाग्रस्त Acid Attack Victims (AAV),</td><td>१</td></tr>
<tr><td>ड</td><td>विशिष्ट शिक्षण अक्षमता Specific learning Disability, (SLD)<br>मानसिक आजार Mental Illness (MI)</td><td rowspan="2">३</td></tr>
<tr><td>इ</td><td>वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी Multiple Disabilities (MD) involving (a) to (d) above</td></tr>
</table>

<table>
<tr><td>अ क</td><td>संवर्ग</td><td>दि.३.३.१९ च्या जाहिराती मध्ये दर्शवलेली एकूण पदे</td><td colspan="10">दिव्यांगासाठी राखीव असलेली एकूण पदे</td><td>गट</td><td>दिव्यांगाचा प्रकार</td><td></td></tr>
<tr><td rowspan="2">२</td><td rowspan="2">आरोग्य सेवक (पुरुष) ४० टक्के</td><td rowspan="2">१०</td><td colspan="3">भज (ड)</td><td colspan="2">वि.मा.प्र.</td><td colspan="3">इ.डब्ल्यु.एस.</td><td colspan="2">खुला</td><td rowspan="2">अ</td><td rowspan="2">अल्पदृष्टी<br>Low vision</td><td rowspan="2">१</td></tr>
<tr><td colspan="10">१<br>(टिप - सन २०१९ मधील जाहिरातीमध्ये एका पायाने दिव्यांग असलेल्या उमेदवारासाठी एक पद राखीव ठेवण्यात आले आहे.)</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td>अ.जा.</td><td>अ.ज.</td><td>वि.जा.(अ</td><td>भज (ब)</td><td>भज (क)</td><td>भज (ड)</td><td>इ.मा.व.</td><td>वि.मा.प्र.</td><td>इ.डब्ल्यु.एस.</td><td>खुला</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के हंगामी फवारणी</td><td>५६</td><td colspan="10">१<br>(टिप - सन २०१९ मधील जाहिरातीमध्ये एका पायाने दिव्यांग असलेल्या उमेदवारासाठी एक पद राखीव ठेवण्यात आले आहे.)</td><td>ब</td><td>कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता<br>Deaf (D), Hard of hearing (H H)</td><td>१</td></tr>
</table>

**शासन शुध्दीपत्रक क्रं संकीर्ण २०२०/प्रक्र ९९/आस्था ८ दिनांक २० ऑगस्ट २०२१ नुसार व शासन पत्र दिनांक २० ऑगस्ट२०२१ नुसार सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्द झाल्याने खुल्या प्रवर्गातील वाढ झालेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे.**

## अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा)

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>संवर्ग</th><th>प्रवर्ग</th><th>खुला</th><th>एकूण पद</th></tr>
<tr><td>१</td><td>प्रयोगशाळा तंत्रज्ञ</td><td>खुला (सर्वसाधारण)</td><td>०१</td><td>०१</td></tr>
<tr><td>२</td><td>आरोग्य सेवक (पुरुष) ४० टक्के</td><td>खुला (माजी सैनिक)</td><td>०१</td><td>०१</td></tr>
<tr><td rowspan="2">३</td><td rowspan="2">आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के हंगामी फवारणी</td><td>खुला (खेळाडू)</td><td>०१</td><td>०१</td></tr>
<tr><td>खुला (प्रकल्पग्रस्त)</td><td>०१</td><td>०१</td></tr>
</table>

### अटी व शर्ती:-

१) दिव्यांगांसाठी विहित टक्केवारीनुसार पद भरतीमध्ये आरक्षण ठेवण्यात आलेले असून मागील भरती वर्षातील अनुशेषाच्या जागा प्रथम भरण्यात येतील व चालू भरती वर्षाच्या जागा भरणे शक्य नसल्यास पुढे ओढण्यात येतील.

२) नव्याने समाविष्ठ झालेल्या दिव्यांगाच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर यापूर्वी माहे मार्च २०१९ मध्ये प्रसिध्द जाहिराती नुसार खुल्या अथवा इतर प्रवर्गातून अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे आवश्यक असेल.

३) दिव्यांगाचे प्रमाणपत्र - शासन निर्णय दिनांक २९ मे २०१९ नुसार दिव्यांगाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या व्यक्तीने सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. निवड प्रक्रीये दरम्यान अथवा नियुक्तीच्या दरम्यान उक्त प्रमाणपत्राची तपासणी / फेरतपासणी करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना असतील.

४) शासन परिपत्रक दि. १८.०३.२०१४ अन्वये अपंग उमेदवारांस लेखनिकांची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज भरताना तसा स्पष्ट उल्लेख करावा. उमेदवाराने स्वत: लेखनिक/ सहाय्यकाची व्यवस्था करणे आवश्यक राहिल. जे उमेदवार लेखनिक / सहाय्यक हा पर्याय निवडतील त्यांना प्रवेशपत्रासोबत लेखनिक घोषणापत्र प्राप्त होईल. सदरील घोषणापत्र उमेदवाराने राजपत्रित अधिकारी यांचेकडून सांक्षांकित

करुन घेऊन परीक्षेच्या वेळी सोबत आणने बंधनकारक राहिल. ज्या उमेदवारांनी लेखनिकाची अर्जात मागणी केलेली नसेल अशा दिव्यांग उमेदवारांना सदर सवलतीचा लाभ मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

५) आरक्षण, परीक्षा शुल्क, वयोमर्यादा व इतर सविस्तर सूचना जिल्हा परिषद औरंगाबादची वेबसाईट www. https://aurangabad.gov.in/ वर प्रसिध्द करण्यात आलेली असून उमेदवारानी त्या अनुषंगाने online पध्दतीने www. maharddzp.com या संकेतस्थळावर अर्ज सादर करावेत.

६) शासन निर्णय दिनांक १४/०६/२०२१ अन्वये दिनांक ०३/०३/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिराती मधील SEBC प्रवर्गाची पदे अराखीव करण्यात येत आहेत. यापूर्वी SEBC प्रवर्गातुन अर्ज करणाऱ्या उमेदवारांना अराखीव अथवा EWS या दोन्हीपैकी एक प्रवर्गाचा विकल्प स्वीकारता येईल. विकल्प सादर न केल्यास SEBC उमेदवारांची अराखीव प्रवर्गात गणना करण्यात येईल.

७) दिव्यांगाचे नवीन प्रवर्गानुसार आवेदनपत्र सादर करणे आणि यापुर्वी SEBC प्रवर्गातून अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांना EWS अथवा खुला (अराखीव) असा विकल्प सादर करण्याकरिता www.maharddzp.com या संकेत स्थळावर जाऊन Login ID व Password create करणे व विकल्प सादर करणे आवश्यक राहिल.

८) SEBC प्रवर्गाची पदे अराखीव प्रवर्गामध्ये समाविष्ठ केल्यामुळे अराखीव प्रवर्गातील समांतर आरक्षणामध्ये वाढ अथवा घट होण्याची शक्यता आहे.

९) दिव्यांगांचे सुधारित आरक्षण धोरणानुसार निश्चित करण्यात आलेली पदे दर्शविणारी जाहीरात आणि SEBC ची पदे अराखीव केल्यामुळे यापूर्वी SEBC प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना अराखीव अथवा EWS या दोन्हींपैकी एक विकल्प निवडणे करीताचे जाहीर प्रगटन **विवरणपत्र (अ)** जिल्हा परिषद औरंगाबाद च्या www.aurangabadzp.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सुलभ संदर्भा करिता दिनांक ०३/०३/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जिल्हा परिषद औरंगाबादची जाहिरात पुनश्च प्रसिध्द करण्यात येत आहे.

१०) जाहिरात क्रमांक ०१/२०१९ दिनांक ०३.०३.२०१९ मध्ये नमूद सर्व अटी व शर्ती कायम रहातील.

११) भरती प्रक्रिया /परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत निर्णय अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी औरंगाबाद हे स्वत:कडे राखून ठेवत आहेत याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

१२) दिव्यांगांचे सुधारित आरक्षण व पदनिश्चिती व सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्य झाल्याने खुल्या प्रवर्गातील वाढ झालेल्या समांतर आरक्षणाच्या पदांसाठी online अर्ज करणे व परीक्षेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | कालबध्द कार्यक्रम | तारीख |
|---|---|---|
| १ | वरील प्रमाणे दिव्यांगांसाठी नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या पदांसाठी व सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्य झाल्याने खुल्या प्रवर्गातील वाढ होणा-या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गासाठी ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची तारीख | **दिनांक ०१ सप्टेबर २०२१ ते २१ सप्टेबर २०२१** |
| २ | SEBC व दिव्यांग प्रवर्गातून पूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना विकल्प व परीक्षा शुल्क सादर करण्याचा कालावधी | **दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१** |
| ३ | **परीक्षोचे वेळापत्रक-**<br>१) प्रयोगशाळा तंत्रज्ञ (सकाळी ११.०० ते १.०० वाजता)<br>२) औषध निर्माता (दुपारी ३.०० ते ५.०० वाजता) | **दिनांक १६ ऑक्टोंबर २०२१** |
| | ३) आरोग्य सेवक (पुरुष) (सकाळी ११.०० ते १.०० वाजता)<br>४) आरोग्य सेवक (महिला) (सकाळी ११.०० ते १.०० वाजता) | **दिनांक १७ ऑक्टोंबर २०२१** |

**सदस्य सचिव**
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद औरंगाबाद

**सदस्य, जिल्हा निवड समिती**
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद औरंगाबाद

**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती**
तथा,
जिल्हाधिकारी, औरंगाबाद

**(ग्राम विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक सकीर्ण २०२०/प्र.क्र.९९/आस्था-८,दिनांक २० ऑगष्ट २०२१ चे सहपत्र)**

## विवरणपत्र "अ"

## जिल्हा परिषदेच्या अधिपत्या खालील आरोग्य विभागाशी संबधित पदभरती बाबत जाहीर प्रगटन

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील गट-क सवर्गातील रिक्त पदांच्या भरतीसाठी माहे मार्च ,२०१९ मध्ये शासनाच्या महाआयटी मार्फत महापोर्टलवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु तत्कालीन परिस्थितीत महापरीक्षा पोर्टल बंद झाल्याने सदरची परीक्षा प्रक्रिया पुर्ण होवू शकली नाही. दरम्यान कोविड-१९ साथरोगाच्या पार्श्वभूमीवर तसेच इतर साथरोगाची शक्यता लक्षात घेता ग्रामीण भागातील जनतेला तात्काळ आरोग्य सेवा मिळणे आवश्यक असल्याने ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाशी संबधित आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता, व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गातील माहे, मार्च २०१९ मध्ये दिलेल्या जाहिराती मधील नमुद सर्व रिक्त पदांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर जाहिरातीनुसार भरावयाच्या रिक्त पदांचा सुधारित तपशील खालील प्रमाणे -

१) आरोग्य सेवक (महिला)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | इमाव | विमाप्र | ईडल्यूएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ३५ | १० | ३ | ३ | ४ | ३ | ४० | ३ | १९ | ६९ | १८९ |
| सर्वसाधारण | २२ | ८ | ३ | ३ | ३ | ३ | २५ | ३ | १२ | ४४ | १२६ |
| खेळाडू | २ | - | - | - | - | - | २ | - | १ | ३ | ८ |
| माजी सैनिक | ५ | १ | - | - | १ | - | ६ | - | ३ | १० | २६ |
| प्रकल्पग्रस्त | २ | - | - | - | - | - | २ | - | १ | ३ | ८ |
| भूकंपग्रस्त | १ | - | - | - | - | - | १ | - | - | १ | ३ |
| अंशकालीन | ३ | १ | - | - | - | - | ४ | - | २ | ७ | १७ |
| अनाथ | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| **दिव्यांग**<br>१० पदे राखीव | अ) अल्पदृष्टी<br>Low vision | | | | | | | | | | ३ |
| | ब) कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता<br>Deaf (D), Hard of Hearing (HH) | | | | | | | | | | २ |
| | क) अस्थीव्यंगता /मेंदूचा पक्षघात Cerebrel palsy (CP)<br>कुष्ठरोग मुक्त Leprosy Cured (LC),<br>शारीरिक वाठ खुंटणे Dwarfism (Dw),<br>आम्ल हल्लाग्रस्त Acid Attack Victims (AAV),<br>(**टीप**- सन २०१९ मधील जाहिराती मध्येअर्ज केलेल्या उमेदवारासाठी एका पायाने दिव्यांग असलेल्या उमेदवारांसाठी १ पद राखीव ) | | | | | | | | | | २ |
| | ड) विशिष्ट शिक्षण अक्षमता Specific Learning Disability, (SLD)<br>मानसीक आजार Mental Illness (MI) | | | | | | | | | | ३ |
| | इ) वरिल अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी<br>Multiple Disabilities (MD) involving (a) to (d) above | | | | | | | | | | |

२) आरोग्य सेवक (पुरुष) ४० टक्के

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | इमाव | विमाप्र | ईडल्यूएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | - | - | - | - | - | १ | - | २ | २ | ५ | १० |
| सर्वसाधारण | - | - | - | - | - | १ | - | २ | २ | ४ | ९ |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| **दिव्यांग**<br>२ पदे राखीव | अ) अल्पदृष्टी Low Vision | | | | | | | | | | १ |
| | क) अस्थीव्यंगता<br>(**टीप**- सन २०१९ मधील जाहिराती मध्येअर्ज केलेल्या उमेदवारासाठी एका पायाने दिव्यांग असलेल्या उमेदवारांसाठी १ पद राखीव ) | | | | | | | | | | १ |

३) आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के हंगामी फवारणी

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | इमाव | विमाप्र | ईडल्यूएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ७ | ४ | २ | २ | ३ | २ | ११ | २ | ६ | १७ | ५६ |
| सर्वसाधारण | ५ | ३ | २ | २ | ३ | २ | ६ | २ | ४ | १० | ३९ |
| खेळाडु | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| माजी सैनिक | १ | १ | - | - | - | - | २ | - | १ | ३ | ८ |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अंशकालीन | १ | - | - | - | - | - | १ | - | १ | २ | ५ |
| अनाथ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **दिव्यांग** २ पदे राखीव | ब) कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता Deaf (D), Hard of Hearing (HH) | | | | | | | | | | १ |
| | क) अस्थीव्यंगता (**टीप**- सन २०१९ मधील जाहिराती मध्येअर्ज केलेल्या उमेदवारासाठी एका पायाने दिव्यांग असलेल्या उमेदवारांसाठी १ पद राखीव ) | | | | | | | | | | १ |

४) प्रयोगशाळा तंत्रज्ञ

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | इमाव | विमाप्र | ईडल्यूएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |

५) औषध निर्माण अधिकारी

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | इमाव | विमाप्र | ईडल्यूएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | १ | २ | - | १ | - | - | - | - | १ | ३ | ८ |
| सर्वसाधारण | १ | १ | - | १ | - | - | - | - | १ | २ | ६ |
| महिला राखीव | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ | २ |

**माहे मार्च,२०१९ मध्ये आरोग्य विभागाशी संबधित पदां करिता आवेदन पत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांसाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे.**

१. माहे मार्च,२०१९ मधील जाहिरातीनुसार आरोग्य विभागाशी संबधित पदांकरीता अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांनी www.maharddzp.com या संकेत स्थळावर जाऊन Login ID व Password create करणे आवश्यक आहे.

२. माहे मार्च,२०१९ मध्ये आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गाकरिता आवेदन पत्र /अर्ज सादर केलेल्या उमेदवारापैकी सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांव्यतिरिक्त इतर प्रवर्गातून अर्ज सादर केलेले उमेदवार संबधित प्रवर्गातून परिक्षेकरिता पात्र राहतील.

३. मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १५७३७/२०१९ व इतर याचिकांमध्ये शासकिय नोक-यामधील नियुक्त्यांसाठी सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास प्रवर्गाचे (एसईबीसी) आरक्षण रद्द ठरविले आहे. सामान्य प्रशासन विभागाने सामाजिक व शैक्षणीक व शैक्षणीक दृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थीकदृष्टया दुर्बल घटकाचा लाभ देण्याबाबत क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१ /१६-अ,दि.२३ डिसेंबर,२०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. यानुसार सामाजिक व शैक्षणीकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा आर्थीकदृष्टया दुर्बल प्रवर्गातून ( EWS) आरक्षणाचा लाभ घेणे ऐच्छिक असेल. या अनुषंगाने सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी आर्थिकदृष्टया दुर्बल प्रवर्गाबाबत ( EWS) अथवा खुल्या प्रवर्गाबाबत वरील प्रमाणे नमूद संकेतस्थळावर दिनांक १ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१ या कालावधीत विकल्प द्यावेत. उमेदवाराने एकदा दिलेल्या विकल्पामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तथापी ,ज्या एसईबीसी (SEBC) प्रवर्गातील उमेदवारोने ईडब्ल्युएस (EWS) प्रवर्गाचा विकल्प

दिला आहे, त्याने परीक्षेपूर्वी सक्षम अधिका-याचे ईडब्ल्युएस ( EWS) प्रवर्गाचे प्रमाणपत्र जिल्हा निवड समितीकडे सादर करणे बंधनकारक आहे. परीक्षेच्या दिनांकानंतर सादर केले जाणारे ईडब्ल्युएस ( EWS) प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.

४. जे सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास(एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देतील ते उमेदवार अथवा जे सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचा विकल्प सादर करणार नाहीत. तथापि खुल्या प्रवर्गातील वयोमर्यादेकरिता पात्र आहेत अश्या उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार म्हणून गणण्यात येईल. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठी लागू असलेले परीक्षा शुल्क ( या पुर्वी एसईबीसी प्रवर्गातून अदा केलेली रक्कम वगळता उर्वरीत रक्कम ) परीक्षेपुर्वी अदा करणे आवश्यक राहिल . सदर उमेदवारांनी **दिनांक १ सप्टेंबर २१ ते दिनांक १४सप्टेंबर २०२१** या कालावधीत वरील प्रमाणे नमूद संकेतस्थळावरुन शुल्क अदा करण्याचे उपलब्ध पर्याय वापरुन शुल्क अदा करणे बंधनकारक राहिल .

५. मार्च,२०१९ च्या जाहीरातीनुसार ऑनलाईन परीक्षेकरीता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी तसेच एका किंवा अधिक सर्वगातील पदासाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि ,आता शासनाचे महापरीक्षा पोर्टल रदद झाल्याने सदरची आरोग्य विभागांशी संबधित पदभरती OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ४ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परीक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदामध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमध्ये परीक्षेकरीता उपस्थित राहता येईल. यासाठी उमेदवाराने परीक्षेकरीता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरील प्रमाणे नमुद संकेतस्थळावर **दिनांक १ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१** या कालावधी पर्यत नोदविणे आवश्यक राहिल. तसेच अनुकंपा नियुक्ती व इतर कारणमुळे माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीतील काही प्रर्वग रद्य झालेले आहे. सदर प्रर्वगा अंतर्गत माहे मार्च १९ मध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवाराने संबधित प्रर्वगातुन वरील प्रमाणे नमुद संकेत स्थळावर दिनांक १ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर या कालावधीत इतर जिल्हा परिषदेचा विकल्प नोंदविणे आवश्यक राहिल.

**६.** नव्याने समाविष्ट झालेल्या दिव्यांगाच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर या पुर्वी माहे. मार्च २०१९ मध्ये प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार खुल्या अथवा इतर प्रवर्गातुन अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे आवश्यक असेल. तसेच यापुर्वी अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांनी दिव्यांगाच्या पदनिहाय आरक्षणात बदल होत असल्याने दिव्यांगाकरिता नव्याने प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार विकल्प देणे आवश्यक आहे.

**७.** यापूर्वी उमेदवाराकडून लेखी परीक्षेस प्रत्यक्ष कोणत्या परीक्षा केंद्रमधुन परीक्षा देणार आहे, त्या परीक्षा केंद्राबाबत प्राथम्यक्रम घेण्यात आले होते. सदर प्राधान्यक्रमानुसार उमेदवारासंबधित जिल्हयातून परीक्षेस बसण्याबाबत प्रवेश पत्र पाठविण्यात येईल.

**८.** माहे मार्च १९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परीक्षेकरिता एका पदा करिता एका पेक्षा जास्त जिल्हा परिषदांकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांनी सर्व ठिकाणी परीक्षा शुल्क भरलेले आहे, तथापी उमेदवारांना एकाच ठिकाणी परीक्षा देता येणार असल्याने संबधित उमेदवारांनी भरलेले अधिकचे परीक्षा शुल्क प्राप्त करुन घेण्यासाठी वरील प्रमाणे नमूद संकेतस्थळावर आवश्यक बॅक तपशील नमूद करणे आवश्यक आहे.

**९.** विकल्प नोंदवितांना काही अडचणी उदभवल्यास उमेदवारांनी ०७२९२००६३०५ या भ्रमणध्वनी वर संर्पक साधावा.
वरीलप्रमाणे भरतीप्रक्रियेमधे आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शासन स्तरावर राखून ठेवण्यात येतील.

स्वाक्षरीत / –
**सदस्य सचिव**
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद औरंगाबाद

स्वाक्षरीत / –
**सदस्य, जिल्हा निवड समिती**
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद औरंगाबाद

स्वाक्षरीत / –
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती**
तथा,
जिल्हाधिकारी, औरंगाबाद